# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601,22690602,22641150,22641151 फॅक्स -2269 2102/2269007.

तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dteMaharashtra.gov.in


क्रमांक: 2अ/एडीएम/2013/ 9390
दिनांक :

7 JUL 2014

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष 2014-15 साठी अँटी रॅगिंग /अँटी कॅपीटेशन फी/ तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याबाबत....

शासनामार्फत शिक्षण संस्थांमध्ये होणा-या रॅगिंगसारख्या अपप्रवृत्तींना आळा घालण्यासाठी सन 199 मध्ये रॅगिंग प्रतिबंध अधिनियम 1999 अंमलात आलेला आहे. (सोबत प्रत जोडली आहे.)

सदर अधिनियमाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या विभागातील व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या पदविका,पदवी,पदव्युत्तर पदवी,पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांमध्ये संस्थांच्या प्राचार्यांना रॅगिंग प्रतिबंध अधिनियम 1999 च्या ठळक प्रती संस्थेच्या आवारात, क्लासमध्ये, कॅंटीन आणि वसतीगृह या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या निदर्शनास येईल अशा पध्दतीने प्रसिध्द करण्याबाबत कळवावे. तसेच प्रथम वर्ष विद्यार्थ्यांची व वरिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांच्या वेगवेगळया बैठका आयोजित करुन त्यांना अधिनियमासंबंधी सूचना देण्यास आणि रॅगिंग प्रकरण संस्थेत घडणार नाही, याबाबत दक्षता घेण्याबाबत कळविण्यात यावे. जर रॅगिंग प्रकरण घडल्यास संबंधित संस्थेच्या प्राचार्यांना जबाबदार धरण्यात येईल ही बाब त्यांच्या निदर्शनास आणावी.

रॅगिंग प्रकरण घडू नये म्हणून खालील सूचनांचे पालन करण्याबाबत संस्थाच्या प्राचार्यांना/संचालकांना कळविण्यात यावे.

1. प्राचार्य, उपप्राचार्य, रेक्टर यांची निवासस्थाने कॉलेज व हॉस्टेल कॅम्पसमध्ये असावीत.
2. त्यांनी दररोज आकस्मिक भेटी, विशेषत: हॉस्टेलना रात्रीच्या वेळी भेटी देण्यात याव्यात.
3. संस्थेच्या माहिती पुस्तिकेत याचे स्पष्टीकरण असावे व दरवर्षी प्रत्येक विद्यार्थी व पालकांकडुन संबधित विद्यार्थी रॅगिंगपासून दूर राहिल असे रुपये 100/- च्या नॉन ज्युडिशिअल स्टॅंपपेपरवर प्रतिज्ञापत्र भरुन घ्यावे.सदर प्रतिज्ञापत्र नोटराईज्ड करण्याची आवश्यकता नाही.
4. वर्षातून एकदा, संस्थास्तरावर पालकांचे मेळावे वर्षभरात एक दोन वेळा आयोजित करावेत व संस्थेची शिस्त आणि विद्यार्थ्यांचे वर्तन या बाबींची त्यातुन माहिती दयावी.
5. विद्यार्थी परिषदांनी आपल्या कार्यक्रमातून रॅगिंग विरुध्द आवाज उठवावा.

त्याचप्रमाणे आपल्या अधिनस्त व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांना अँटी कॅपिटेशन ॲक्टमधील सर्व तरतूदी बंधनकारक असून त्याचे उल्लंघन करणा-या संस्थांवर कारवाई करण्यात येईल याची जाणीव करून देण्यात यावी. (सोबत ॲक्टची प्रत जोडण्यात येत आहे)

तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये Womens Redresal Cell (महिला तक्रार निवारण समिति) स्थापन करणे व त्याची माहिती संस्थेच्या माहितीपुस्तिकेत व संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे अनिवार्य असल्याची बाब सर्व संस्थांना कळविण्यात यावी.

(डॉ.सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

आवक क्रमांक ..5231..

पृष्ठांकन/तंशिस/प्राकाना/शैवि/२०१४/ 2354
दिनांकः- 19 JUL 2014

प्रति,

संचालक/प्राचार्य

सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी व पदविका तसेच तस्सम संस्था,

नागपूर विभाग, नागपूर

**उपरोक्त पत्रात नमुद केल्यानुसार कार्यवाही करण्यांत यावी.**

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर.